दैनिक **महावृत्त**

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १९६ वा बुधवार दि.२२ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ज्येष्ठ पत्रकारांना १ एप्रिलपासून २० हजार रूपये सन्माननिधी

मुंबई : प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा ११ हजार रूपये सन्माननिधी देण्यात येतो. तो वाढवून २० हजार करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२५ पासून करण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

बीड प्रकरणावरून सुरू असलेल्या वादंगाच्या पार्श्वभूमीवर आज पत्रकार पुरस्कार समारंभात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मीडिया ट्रायल बद्दल आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. पत्रकारांना चुका दाखवण्याचे, टीका करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेलच पाहिजे. त्याबाबत कोणाचेही दुमत नाही. पण अनेकदा आम्हालाही माहिती नसलेल्या बातम्या सूत्रांच्या हवाल्याने दिल्या जातात. टीआरपी वाढवण्यासाठी शहानिशा न करता सनसनाटी बातम्या प्रसारित केल्या जातात. चौकशी पूर्ण होण्याआधीच एखाद्याला आरोपीच्या पिंज–यात उभे करून मीडिया ट्रायल केली जाते. हे चुकीचे आहे, अशी नाराजी अजित पवार यांनी व्यक्त केली. पत्रकारांप्रमाने तुमच्या त्या विश्वसनीय सूत्रांनाही एखादा पुरस्कार देत जा, असा टोलाही त्यांनी लगावला.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने उत्कृष्ठ पत्रकारिता पुरस्कार आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना अजित पवार यांनी आजच्या पत्रकरितेबद्दल आपली परखड भूमिका मांडली. प्रसारमाध्यमे अत्यंत वेगवान झाली आहेत. एका क्षणात जगभर बातमी जाते. मागच्या आठवड्यात बारामतीतील कृषी प्रदर्शनात असताना सैफ अली खान यांच्यावरील हल्ल्यासंदर्भातली बातमी आली. सकाळी ७ वाजता प्रदर्शन बघत असताना तिथे लगेचच माध्यमांनी सैफ यांच्यावरील हल्ल्याबाबत माझी प्रतिक्रिया विचारली. हल्ला कुठे झाला, कसा झाला याची काहीच कल्पना मला नव्हती.

त्यानंतर विरोधकांनी लगेच मुंबईतील कायदा सुव्यवस्था ढासळल्याचे आरोप सुरू केले. थोडे धीराने घेत चला, असा उपरोधिक सल्ला अजितदादांनी दिला. अजित पवार कुठे दिसला नाही की लगेच अजित पवार नॉट रिचेबल, अजितदादा कुठे गेले, अशा बातम्या सुरू होतात. आम्हाला आमच्याबाबतच माहिती नसलेल्या बातम्या सुत्रांच्या हवाल्याने देण्यात येतात. मिडिया ट्रायल करण्यात येते. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असेल तरीही मीडिया ट्रायल होते. माझ्यावर तर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. त्या प्रकरणात मी खूप भोगले आहे. आतापर्यंत त्या आरोपांच्या चौकशा सुरू होत्या. ही नेमकी सूत्रे कोण असतात ते मी पत्रकारांकडून जाणून घेणार आहे. या सूत्रांना देखील एखादा जीवनगौरव पुरस्कार द्यायला हरकत नाही असा टोला अजित पवार यांनी लगावला. हे सगळे प्रकार टीआरपी वाढविण्यासाठी करावे लागतात असे माध्यमांचे म्हणणे असते. पण बातम्या प्रसारित करताना प्रसारमाध्यमांनी सनसनाटी टाळून जबाबदारीने वागावे असा सल्लाही त्यांनी दिला.

आईंना उगाच मनस्ताप झाला

विधानसभेची मतमोजणी २३ तारखेला होती. त्याच्या आदल्या दिवशी एकनाथ शिंदे वर्षा बंगल्यावर होते. देवेंद्र फडणवीस आणि मी विविध ठिकाणी होतो. त्यावेळी संध्याकाळी बातम्या बघत असताना विरोधकांचे खातेवाटप सुरू होते. शिवसेना ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, काँग्रेसने हॉटेल, हेलिकॉप्टर बुक केली होती. एखादा आमदार लांबच असेल तर त्याला आणण्यासाठी विमानेही बुक करण्याची तयारी ठेवली होती. सगळेच प्लॅनिंग विरोधकांचे सुरू होते. दुस–या दिवशी सकाळी मतमोजणी सुरू झाली. सकाळी सकाळीच बातमी चालली की अजित पवार पोस्टल बॅलटमध्ये पिछाडीवर. हे ऐकल्यानंतर माझी आई तणावात आली. तिने बिचारीने देवाचा धावा सुरू केला. मी संबंधित अधिका–यांकडून माहिती घेतली त्यांनी तसे काहीच नाही असे सांगितले, नंतर मी चॅनेलला फोन केला. त्यांनी सांगितले की दादा असे म्हणावे लागते. त्यामुळे आमचा टीआरपी वाढतो. असे करणे योग्य नाही. वास्तव आणि सत्य बातम्याच दाखवाव्यात अशी अपेक्षा अजित पवार यांनी व्यक्त केली.

# बौध्द धम्माचे पालन म्हणजे सत्याचे पालन होय –भिक्खू पय्यानंद थेरो



लातूर :–बौद्ध धम्मात शील, सदाचार व नीतीमत्ता या तत्वाची मूळ शिकवण सांगितली आहे. बौध्द धम्माची शिकवण ही सांगण्यासाठी अथवा दाखवण्यासाठी नाही तर प्रत्यक्ष सत्य धर्माचे आचरणासाठी आहे. त्यामुळे बुध्दाच्या धम्माचे पालन हे सत्याचे आचरण होय असे प्रतिपादन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे

दर रविवार, चलो बुध्द विहार अभियाना अंतर्गत ४१व्या रविवार दिनी सामूहिक बुध्द वंदना आणि धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन जेतवन बुध्द विहार अजनी ता. शिरूर अनंतपाळ येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचा प्रारंभ तथागत बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुष्पाने, दीपाने आणि पूजेने भिक्खू संघाच्या हस्ते करून त्रीशरण, पंचशिल व सामूहिक बुध्द वंदनेने करण्यात आली. या प्रसंगी पु. भिक्खू बुद्धशील, पु. भिक्खू बोधिराज यांचीही धम्म प्रवचने झाली. तद्दनंतर प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. देवदत्त सावंत, डॉ. विजय अजनीकर, काशिनाथ आजनिकर, राहुल बानाटे, मंगल कांबळे ई. आपापले मनोगत व्यक्त केले. यावेळी सामूहिकपणे बावीस प्रतिज्ञांचे तथा संविधान प्रास्ताविकीचे वाचन करण्यात आले. धम्मपालन गाथेनंतर सामूहिक राष्ट्रगानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद धावारे यांनी केले तर आभार अशोक अजनीकर यांनी मानले.

या प्रसंगी माधव अजनीकर, गोरोबा अजनीकर, भागवत अजनीकर, अनिल अजनीकर, बालाजी कांबळे, अशोक कांबळे, शेषराव कांबळे, भागवत कांबळे, बाबुराव कांबळे, पंकज कांबळे, बाबासाहेब कांबळे, गणपत कांबळे, बब्रवान कांबळे, गंगाधर कांबळे, सुनील कांबळे, दादाराव कांबळे, विश्वनाथ बोडके, गोविंद बोडके, भीमराव कांबळे, कालिदास कांबळे, उत्तम कांबळे, पांडुरंग अंबुलगेकर, डॉ. अरुण कांबळे, शिवाजी सोनकांबळे, सुधाकर कांबळे, करण ओव्हाळ, संघमित्रा कांबळे, ज्योती कांबळे, मुद्रिका कांबळे, सुजाता कांबळे, सुरेखा कांबळे, सुनीता कांबळे, मीना कांबळे, सुशीला कांबळे, सुभद्रा वाघमारे, सुवर्णा कांबळे, कल्पना कांबळे, रुक्मिना कांबळे, पंचशीला बनसोडे, प्रेमा कांबळे, अंजली सोनकांबळे, शांता काकडे, जयश्री कांबळे, रमा शेळके, बालिका जोगदंड, पंचशीला भडके, सृष्टी भडके, सरिता बनसोडे, सुमन उडानशिव ई. सह या गावातील सर्व प्रतिष्ठित, जेष्ठ उपासक–उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सोमनाथ सुर्यवंशी यांच्या परिवाराला समाजाने सरळ हाताने आर्थिक मदत करावी..! नारायण बागडेंचे आवाहन.



परभणी / दिनांक :१४ जानेवारी २०२५ रोजी परभणी येथे सोमनाथ सुर्यवंशी यां परिवाराच्या निवासस्थानी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी ते म्हणालेकी जेंव्हा जेंव्हा आंबेडकरी अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला तेंव्हा तेंव्हा अशा या भिम सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन आंबेडकरी बाणा जिवंत ठेवला, संविधानाच्या रक्षणासाठी सोमनाथ सुर्यवंशी यांनी आपल्या जिवाची बाजी लावून पोलिस अत्याचारात शहिद झाला आहे आणि म्हणून आपण आपली सामाजिक बांधिलकी समजुन या स्वाभिमानी परिवारास समाजातील धनदांडगे यांनी सोमनाथ सुर्यवंशी यांच्या परिवाराला आर्थिक मदत करावी असे आवाहन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केली. ते परभणी येथील भिमगड या निवासस्थानी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेण्यासाठी आले असता बागडे सरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सोमनाथ ची मातोश्री यांनी आपल्या मुलांच्या दुःखाचे कथन केले असता डोळ्यात अश्रू उभे राहिले, सोमनाथला फार शिक्षणाची फार आवड होती तो त्या घरचा मोठा मुलगा होता त्यांच्या आई वडीलांनी काबाडकष्ट करून त्यांनी आपल्या दोघा मुलांना उच्चशिक्षित केले तो पण वकिलीची परिक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या व्यवसायात यशस्वी भरारी घेवुन समाजाची सेवा करून संविधानाने दिलेल्या लोकशाहीच्या रक्षणासाठी कायद्याचे दान गोरगरिबांना देणार होता, परंतु अचानक त्यांच्या जीवनात मोड आला संविधानाच्या अस्मितेसाठी परभणी येथील निघालेल्या मोर्चात सहभागी झाला संविधानाच्या रक्षक संविधानाच्या रक्षणासाठी शहिद झाला, त्या माऊलीने शासनाची आर्थिक मदत नाकारून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा ठोठावली पाहिजे तेव्हाच सोमनाथ चे स्वप्न पूर्ण होईल..! हा टोहफोडला आता बघू या सत्तेची मलाई खाणारे आमच्यातले किती नेते सोमनाथला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतात. या प्रसंगी (आंरिमो) परभणी जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव सुंगधे, सुरदास अंभोरे, राजीव कांबळे हे उपस्थित होते.

# कामगारांकडे ठेकेदारांचे दुर्लक्ष



नवी मुंबई / के. एच. हनवते:– नेरूळ नवी मुंबई एल पी ब्रिज खाली डांबर टाकण्याचे काम चालू असताना कामगारांकडे एक नजर वळली पाहतो तर काय ? चक्क करून सोडणारी बाब लक्षात आली कामगारांच्या पायात साधी शिल्पर आहे आणि हे कामगार गरम डांबरांमध्ये साधी स्लीपर चप्पलवर काम करत आहेत त्यांना सुरक्षितेची कुठलीही व्यवस्था ठेकेदाराने केली नाही. याकडे संबंधित ठेकेदार किवा आधिकारी लक्ष देतील का ? आपल्या देशात कामगारांना अजिबात किंमत नाही फक्त ठेकेदारांना किंमत दिली जाते. हे सर्व संविधाना विरोधात काम चालत असून लोकशाहीच्या नावाने खाजगीकरण आणि ठेकेदार शाही सुरू झाली आहे यापासून लोकांनी सावधान राहून आपले हक्क आणि आधिकारावर आपन ठाम आसले पाहीजे अशाप्रकारे कामगारांची पिळवणूक होता कामा नये.

# चोरीच्या १२ मोटरसायकल जप्त. ०२ आरोपी अटक. मोटार सायकल चोरीचे ०८ गुन्हे उघड


## चोरीच्या १२ मोटरसायकल जप्त. ०२ आरोपी अटक. मोटार सायकल चोरीचे ०८ गुन्हे उघड


लातूर :– चोरीच्या १२ मोटरसायकल जप्त. ०२ आरोपी अटक. मोटार सायकल चोरीचे ०८ गुन्हे उघड या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना पथकाला मिळालेल्या माहिती वरून खालील नमूद आरोपींना त्यांनी चोरलेल्या मोटारसायकलीसह ताब्यात घेण्यात आले आहे.



श्रीरंग लक्ष्मण सारगे वय ५० वर्ष राहणार गव्हाण तालुका निलंगा जिल्हा लातूर, गोवर्धन व्यंकटी काळे, वय ३४ वर्ष, राहणार अंबाजोगाई रोड अहमदपूर.

यांना त्यांच्या कडे असलेल्या एकूण बारा मोटारसायकलसह ताब्यात घेऊन मोटार सायकल संदर्भाने विचारपूस केली असता सदरच्या मोटरसायकली ह्या लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरी केले असल्याचे सांगितले.

नमूद आरोपीकडून चोरीच्या १२ मोटारसायकली एकूण किंमत २ लाख ८५ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील मोटरसायकल चोरीचे दोन गुन्हे, पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथील मोटार सायकल चोरीचे दोन गुन्हे, तर पोलीस ठाणे गांधी चौक, निलंगा, अहमदपूर व चाकूर येथील प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण ०८ मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून उर्वरित चार मोटार सायकल बाबत तपास सुरू आहे.

याप्रमाणे नमूद आरोपीनी चोरलेल्या मोटारसायकली जप्त करण्यात आले असून असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पुढील कार्यवाहीस्तव नमूद मुद्देमाल व आरोपींना पोलीस शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस अंमलदार माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे, तुराब पठाण, संजय कांबळे, राजेश कंचे, पुट्ठेवाड, नकुल पाटील, सिद्धेश्वर जाधव, सुधीर कोळसुरे, राहुल सोनकांबळे, युवराज गिरी, मोहन सुरवसे यांनी पार पाडली.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# फास्ट न्याय हवा

कोलकातामधील सरकारी आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात निवासी महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार व हत्येचे प्रकरण संपूर्ण देशात गाजले. आता या प्रकरणातील आरोपी संजय रॉय याला दोषी ठरवत १६४ दिवसांनंतर सियालदाह न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. हा खटला दुर्मिळातील दुर्मीळ नसल्याने त्याला मृत्युदंड देता येणार नसल्याचे सांगत राज्य सरकारला पीडितेच्या कुटुंबाला १७ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. पण कुटुंबाने ते स्वीकारण्यास नकार दिला आहे. तत्पूर्वी संजय रॉयला न्यायालयाने कलम ६४ अंतर्गत बलात्कारासाठी आणि कलम ६६ व १०३(१) अंतर्गत हत्या व मृत्यूसाठी दोषी ठरवले. सीबीआयने त्याच्यावर ठेवलेले सर्व आरोप सिद्ध झाले असून, एरवी टीकेस पात्र ठरवण्यात येणारी ही तपास यंत्रणा कौतुकास पात्र ठरली आहे. मात्र न्यायाधीश निकाल देत असताना, 'मला या प्रकरणात गुंतवण्यात आले आहे. मी गळ्यामध्ये रुद्राक्ष घालतो आणि जर मी गुन्हा केला असता तर तो तुटला असता', असे उद्गार संजयने काढले. तो किती खोटारडा, ढोंगी आणि अट्टल बदमाश आहे, हे न्यायालयात दिसून आले आहे. आरोपी संजयने इतके भयंकर कृत्य केले केले आहे की, त्याला लवकरात लवकर फाशी दिली जावी, ही जनभावना होती. पण लोकशाहीत जनभावनेनुसार न्याय होत नाही, तर पोलिसांनी तपास त्वरेने करून पुरावे गोळा करावे लागतात. वेळेवर आरोपपत्र देऊन, उत्तम वकिलांकरवी समर्पक युक्तिवाद करावा लागतो.

२०१२ मध्ये दिल्लीत 'निर्भयाकांड' घडले होते. त्यानंतर बलात्कारविरोधी कडक कायदा करण्यात आला. पण तरीही अत्याचार थांबलेले नाहीत. मुंबईतील केईएम इस्पितळात १९७३ मध्ये अरुणा शानभाग प्रकरण झाले. कोलकाताच्या या 'अभया' प्रकरणात तपास मार्गी लावा, नाही तर तो सीबीआयकडे सोपवू, असे खुद्द मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावरच म्हणण्याची वेळ आली! पश्चिम बंगालच्या पोलिस दलाच्या कार्यक्षमतेवर त्यांनीच प्रश्नचिन्ह निर्माण केले. एरवी सीबीआयवर तोफ डागणार्या ममता बॅनर्जी या यथावकाश त्याच यंत्रणेकडे तपास सोपवण्यास राजी झाल्या! ही पीडिता महाविद्यालयात मरण पावल्याचे आढळले, तेव्हा ती आत्महत्या असल्याचा दावा महाविद्यालयाच्या प्रशासनाने केला होता. मुलीचा मृतदेह पालकांना दाखवणेही टाळण्यात येत होते. चौकशीपूर्वीच ही आत्महत्या असल्याचा खोटारडेपणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप घोष यांनी केला होता. त्यामुळे त्यांची उचलबांगडी करावी लागली. आरोपी संजय हा चक्क 'पोलिसमित्र' म्हणून भूमिका बजावत असल्याचे पुढे समजले. या सर्व घटनेच्या निषेधार्थ कोलकात्यात मोर्चे निघाले आणि नंतरदेशात डॉक्टरांनी एक दिवसाचा बंद पुकारला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली. एवढेच नव्हे, तर पश्चिम बंगालमधील अनेक दिवस संपावर असलेल्या निवासी डॉक्टरांना न्यायालयाने पुन्हा कामावर रुजू होण्याचे आवाहन केले.

पीडितेला न्याय मिळावा आणि सरकारी इस्पितळांमधील सुरक्षेत वाढ व्हावी, या डॉक्टरांच्या मागण्या होत्या. त्यानुसार प. बंगाल सरकारने सुरक्षेत वाढ केली आणि हा खटलाही जलद चालवला. सुदैवाने 'या निकालाला आम्ही आव्हान देणार नाही. जर त्याने काही गुन्हा केला असेल, तर त्याला योग्य शिक्षा मिळायला हवी', अशी प्रतिक्रिया संजयच्या बहिणीने दिली आहे. तर 'मला तीन मुली असून, संजयला अगदी फाशी दिली तरी काही हरकत नाही', असे संजयच्या आईनेही म्हटले आहे. स्त्रीच स्त्रीची वेदना समजू शकते. या प्रकरणात डॉक्टरांनी जी एकजूट दाखवून लढा दिला, तो प्रशंसनीयच म्हणावा लागेल. मात्र या गुन्ह्यात संजय एकटा नव्हता. त्याच्यासोबत अन्यही काहीजण होते. त्यांना अद्याप अटक झालेली नाही. सर्वांना शिक्षा होत नाही तोवर झोप लागणार नाही, अशा भावना पीडितेच्या आईने व्यक्त केल्या आहेत. हे जर खरे असेल, तर अन्य फरार आरोपी कुठे आहेत, असाही प्रश्न निर्माण होतो. मात्र भारतात दशकानुदशके खटल्यांचा निकाल लागत नाही. अनेकदा साक्षीदार, आरोपी आणि फिर्यादी यांचे निधन होऊनही निवाडा होत नाही, हा अनुभव आहे. पण 'अभया'बाबत तारीख पे तारीख न होता, साडेपाच महिन्यांत निकाल लागला, ही स्वागतार्ह बाब आहे.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, देशातील महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या संदर्भात महाराष्ट्र तिसर्या क्रमांकावर आहे. खैरलांजी हत्याकांड, कोपर्डी, हिंगणघाट जळीतकांड, भंडारा व बदलापुरातील बलात्कारामुळे समाजमन सुन्न आहे. वयोवृद्धापासून ते अल्पवयीन मुलांपर्यंत सर्व वयोगटातील पुरुष या अत्याचारात सामील असल्याचे आढळून आले आहे. अनेक आंदोलने, कायदे, उपाययोजना होऊनही अत्याचाराच्या संख्येत घट न होता उलट वाढच होत आहे. पीडित महिलांना त्यांनी न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगावी तर लागतेच. पण वेळेवर न्यायही मिळत नाही. खैरलांजीमधील अमानुष हत्याकांड २००६ मध्ये झाले. त्यात पाचजणांची निर्घृणपणे हत्या झाली आणि दोघींवर शारीरिक अत्याचारही झाले होते. पण आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावेपर्यंत चार वर्षे निघून गेली. आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी करत फिर्यादी भैयालाल भोतमंगे यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची वाट पाहावी लागली. अनेकदा फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करूनही निकाल लवकर लागत नाहीत. त्यामुळे वेळेवर आरोपपत्र दाखल करणे, अत्याचारासारखे गुन्हे अजामीनपात्र करणे, समाजमाध्यमांतून महिलांची बदनामी थांबवणे यांसारखे उपाय तातडीने राबवले पाहिजेत. तसेच यासंबधीची पोलिसांमधील संवेदनशीलता वाढवणे आणि न्यायाधीशांच्या रिकाम्या जागा भरणे ही पावले उचलणे आवश्यक आहे. शेवटी वेळेवर न्याय न मिळणे हे न्याय न मिळाल्यासारखेच असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

# भूकंपीय शिबीर आवश्यक

तिबेटमध्ये अलीकडेच झालेल्या शक्तिशाली भूकंपाने हिमालय क्षेत्रात चिंता वाढली आहे. दीर्घकाळापासून या भागात भूकंपाचे धक्के बसलेले नव्हते. या स्थितीला 'सेस्मिक गॅप' असे म्हणतात. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते, या गॅपमुळे पृथ्वीच्या पोटात व्यापक प्रमाणात भूगर्भीय ऊर्जा सक्रिय झाल्याने भूकंप येण्याची शक्यता राहते. भविष्यातील संभाव्य भूकंपांची शक्यता लक्षात घेता भारतात भूकंपीय नेटवर्क मजबूत करणे आणि त्यासंबंधी इशारा देणार्या प्रणालीला विकसित करणे महत्त्वाचे आहे.



नव्या वर्षाच्या पहिल्या आठवड्यात तिबेटच्या शिगात्से क्षेत्रात सुमारे ७ रिश्टर स्केल एवढ्या तीव्रतेचा भूकंप झाला. त्याचे धक्के उत्तर भारत आणि हिमालयीन राज्याला जाणवले. हा भूकंप या भागाला एकप्रकारे इशारा देणारा आहे. कारण हिमालयीन राज्य हे भूकंपाच्या संवेदनशीलतेच्या दृष्टिकोनातून पाच-चार झोनमध्ये मोडते आणि ते सर्वाधिक संवेदनशील क्षेत्र म्हणून ओळखले जाते. भूगर्भशास्त्राच्या शास्त्रज्ञांनी दिलेल्या इशार्यानुसार, गेल्या शंभर वर्षांत या भागात ८ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसलेला नाही. त्यामुळे पृथ्वीत खूप प्रमाणात भूगर्भीय ऊर्जा निर्माण झालेली असू शकते. या ऊर्जेतील घटही धोकादायक स्थितीतून बाहेर पडू शकते. भूकंपाला थांबवता येत नाही. मात्र सजगता अणि जागरुकतेने सुरक्षा निश्चित करता येऊ शकते. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या संकेतस्थळावर ८ जानेवारीच्या दिवशी सिक्कीममध्ये २.८ पासून ४.९ रिश्टर स्केलच्या सुमारे २४ भूकंपांची नोंद झाली. ७ जानेवारी रोजी तेवढेच भूकंप सिक्कीममध्ये नोंदले गेले. यावर्षी एक जानेवारी ते ८ जानेवारीपर्यंत मणिपूर, हिमाचल प्रदेशचा डोडा, मध्य प्रदेशातील सिंगरौली आणि गुजरातच्या कच्छ भागात डझनभर भूगर्भीय हालचाली नोंदल्या गेल्या. लोकसभेत ६ डिसेंबर २०२३ रोजी पृथ्वी विज्ञान मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर भारत आणि नेपाळमध्ये होणार्या भूकंपांची संख्या सातत्याने वाढत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे नेपाळमध्ये अल्मोडा फॉल्ट सक्रिय होणे.

भारताचा हिमालय परिसर हा भूगर्भीय रचनेवरून संवेदनशीलरीत्या भूकंपप्रवण राहिला आहे. हिमालय भाग हा भूभर्गीयशास्त्राच्या दृष्टिकोनातून पृथ्वीवरील सर्वाधिक संवेदनशील भागांपैकी एक आहे. हिमालय हा सर्वात नाजूक आणि संवेदनशील पर्वत मानला जातो. हा भाग युरेशिया आणि भारतीय प्लेट यांच्यात स्थिरावलेला आहे. जेव्हा दोन्ही प्लेट एकमेकाला धडकतात तेव्हा ती धडक भूकंप होण्यास कारणीभूत ठरते किंवा त्यापैकी एक कारण मानता येते. भूगर्भीय इतिहासानुसार भारतीय उपखंड हा मूळ रूपाने एक बेट होता आणि तो ५० दशलक्ष वर्षांपूर्वी आशियाला धडकला आणि या प्रक्रियेत हिमालयाची निर्मिती झाली. या धडकेमुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावार तीव्र दबाव अणि ताण निर्माण झाला आणि तो अजूनही भूकंपाला कारणीभूत ठरतो. भारतीय आणि युरेशिया प्लेटची सतत धडक होत राहते अणि परिणामी व्यापक प्रमाणात भूगर्भीय ऊर्जा निर्माण होते. याप्रमाणे अचानक भूकंपाचे धक्के पृथ्वीच्या पृष्ठभागावर जाणवू लागतात. हिमालय भाग हा उंच ठिकाणी असून तेथील जमिनीवर सतत बदल होत राहतो. भूकंपाचे धक्के या पर्वतरांगातील रचनेत उलथापालथ घडवून आणतात. पर्वतील भागात खाण उत्खनन, जलविद्युत प्रकल्प आणि अन्य बांधकामाच्या योजनांमुळे भूकंपाची शक्यता अधिकच बळावते. या घडामोडीमुळे जमिनीच्या पोटात दबाव वाढतो आणि त्यामुळे भूकंपाचे धक्के जाणवू लागतात.

उत्तराखंड आणि हिमालयाच्या भागात गेल्या शंभर वर्षांत मोठा भूकंप झालेला नाही. हिमालय भागात शेवटचा मोठा भूकंप (८ रिश्टर स्केल) १९३४ मध्ये (नेपाळ, बिहार) आणि १९५० मध्ये आसाममध्ये झाला होता. या स्थितीला सेस्मिक गॅप असे म्हणतात. या गॅपमुळे व्यापक प्रमाणात भूगर्भीय ऊर्जा जमा होत राहते. ही ऊर्जा बराच काळा रिलिज न झाल्यास भविष्यात मोठा भूकंप होण्याची शक्यता राहते. ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले तर १८०३ मध्ये गढवालमध्ये भूकंप झाला आणि त्याची तीव्रता ७.५ रिश्टर स्केलपेक्षा अधिक होती. त्यामुळे मोठा हाहाकार माजला. त्यानंतर प्रचंड दुष्काळ पडला. १९०५ मध्ये कांगडा येथे भूकंप झाला आणि त्याची तीव्रता ७.८ रिश्टर स्केल होती. त्यामुळेही हिमालय भागात गोंधळ उडाला. १९५० मध्ये आसाम तिबेटमध्ये झालेल्या भूकंपाची तीव्रता ८.६ रिश्टर स्केल होती. हा हिमालयात नोंदला गेलेला सर्वात मोठा भूकंप होता. मात्र उत्तराखंड यापासून वाचला.

भारत सरकारने भारतीय मानक (निकष) १८९३ सारखे बांधकामातील निकषांना लागू केले असून ते भूकंपविरोधी व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जाईल. याशिवाय विविध शास्त्रीय शोधाच्या माध्यमातून भूकंपाच्या संभाव्य शक्यतेचा अंदाज वर्तविला जाऊ शकतो. यासाठी उपग्रह आणि अन्य आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येऊ शकतो. भारतात भूकंपीय नेटवर्क मजबूत करणे आणि त्यासंबंधी इशारा देणार्या प्रणालीला विकसित करणे महत्त्वाचे आहे. भूकंपाच्या स्थितीत नागरिकांनी कशी खबरदारी घ्यायला हवी हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे.

# महिलाकेंद्रीत योजना

अलीकडील अभ्यासातून असे दिसून आले आहे की, ज्या राज्यांमध्ये महिलाकेंद्रित योजना लागू करण्यात आल्या आहेत, त्या राज्यांमध्ये महिलांच्या मताच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळेच प्रत्येक निवडणुकीपूर्वी जवळपास सर्वच राजकीय पक्ष महिलांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करताना दिसताहेत.



अलीकडे या लोकप्रिय योजनांनी मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि झारखंडमधील सरकार पुन्हा सत्तेवर आल्यामुळे सत्तेच्या वाटेची ही जणू गुरुकिल्लीच बनली आहे. एखाद्या राज्यात महिलांचा विकास होतो तेव्हा त्या त्यांच्या लोकशाही अधिकारांबाबत अधिक जागरूक होतात. सरकारच्या मोफत योजनांचेही त्यांना आकर्षण आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संशोधन अहवालात असे दिसून आले आहे की, महिला केंद्रित योजना लागू करणार्या राज्यांची संख्या १९ वर पोहोचली आहे. यामध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आसाम आणि कर्नाटक ही राज्ये आघाडीवर आहेत. या राज्यांमध्ये महिला मतदारांची संख्या सरासरी ७.८ लाख (एकूण १.५ कोटी) वाढली आहे. दुसरीकडे, ज्या राज्यांमध्ये महिला केंद्रित योजनांकडे फारसे लक्ष दिले जात नव्हते, तेथे महिला मतदारांच्या संख्येत कमी वाढ झाली आहे. विविध निवडणुकांमध्ये महिला मतदारांचा उत्साह निर्विवादपणे वाढत आहे. कोणत्याही राजकीय पक्षाच्या विजयात किंवा पराभवातही महिलांची निर्णायक भूमिका स्पष्टपणे दिसून येते.

ताजा संशोधन अभ्यास दर्शवितो की, २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तुलनेत २०२४ मध्ये १.८ कोटी अधिक महिला मतदारांनी मतदान केले. देशाच्या निवडणूक आयोगाने नुकतीच ही आकडेवारी जाहीर केली आहे. दुसरीकडे एसबीआयच्या संशोधनात महिला मतदारांची संख्या वाढवण्यास मदत करणार्या कारणांचे विश्लेषण केले आहे. या अहवालावरून असे दिसून आले आहे की, प्रधानमंत्री जन धन योजना आणि मुद्रा खाते उघडणे यांचा प्रभाव महिला मतदारांवर स्पष्टपणे दिसत होता. ज्या राज्यांमध्ये महिला केंद्रित योजना अस्तित्वात आल्या आहेत, त्या राज्यांमध्ये लोकशाही प्रक्रियेतील महिलांचा सहभाग वाढला आहे, असा निष्कर्षही यातून काढण्यात आला. याखेरीज या अभ्यासानुसार, महिला साक्षरतेतील वाढीचाही थेट संबंध महिला मतदारांच्या वाढीशी असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिला साक्षरतेत एक टक्का वाढ झाल्यास महिला मतदारांची संख्या २५ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. अहवालानुसार, साक्षरतेत वाढ झाल्यामुळे ३० लाख अतिरिक्त महिलांनी मतदान केले. त्याचप्रमाणे पंतप्रधान आवास योजनांमध्ये महिलांचा सहभाग होताच महिला मतदारांची संख्याही वाढली आहे. आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे एससी आणि एसटी प्रवर्गातील मतदानात सातत्याने वाढ होत आहे. याउलट सर्वसाधारण प्रवर्गातील मतदानात घट झाली आहे.

महिला मतदारांना रोख रक्कम देण्याच्या विविध राजकीय पक्ष आणि सरकारच्या योजनांनाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये निवडणुकीनंतर सत्ताधारी पक्षांच्या पुनरागमनात महिला मतदारांची भूमिका निर्णायक ठरली. मध्य प्रदेशातील लाडली बहन, महाराष्ट्रातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणि झारखंडमधील मैनिया सन्मान योजना ही त्याची उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये लक्ष्मी भंडार, कर्नाटकात गृहलक्ष्मी, ओडिशात शुभद्रा योजना आणि आसाममध्ये मुख्यमंत्री महिला उद्योजकता योजना पुढे आल्या आहेत.

आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीतही ही स्पर्धा दिसून येत आहे. आप सरकारने महिला मतदारांना महिला सन्मान योजनेंतर्गत २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले असताना काँग्रेसने अडीच हजार रुपये देण्याची योजना आखली आहे. भाजपही या दिशेने गंभीर आहे. याचे कारण दिल्लीत महिला मतदारांची टक्केवारी पुरुष मतदारांच्या तुलनेत बरोबरीला पोहोचली आहे. २०२० च्या निवडणुकीत महिलांच्या मतदानाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. महिलांसाठीच्या या योजना स्वागतार्ह असून त्यांचा कायमस्वरूपी परिणाम होऊन महिला स्वावलंबी बनल्यास देशाचे एकूण अर्थकारण पालटू शकते.

## राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त आयोजित उपक्रमांमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे

लातूर, दि. २१ : राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त २५ जानेवारी २०२५ रोजी गाव ते जिल्हा पातळीवर विविध उपक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमांमध्ये सर्व शासकीय विभागांसह खासगी आस्थापना, शाळा, महाविद्यालये यांनीही सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. राष्ट्रीय मतदार दिवस पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, संदीप कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम, शासकीय महिला निवासी तंत्र निकेतनचे प्राचार्य श्री. राठोड, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, निवडणूक नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शाळा व महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य यावेळी उपस्थित होते.राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. तसेच प्रत्येक गावामध्ये राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करावे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त जिल्हास्तरावर आयोजित कार्यक्रमांची माहिती दिली. २५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता दयानंद सभागृह येथे राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून त्यादृष्टीने करण्यात येत असलेल्या तयारीची त्यांनी माहिती दिली.

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन

लातूर, दि. २१ : भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रविवार, २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजता राष्ट्रध्वज वंदन समारंभ लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे होत आहे. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आढावा घेतला.

उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, संगीता टकले, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

ध्वजवंदनेनंतर संचलन, विविध पुरस्कारांचे वितरण, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध शासकीय विभागांमार्फत तयार करण्यात आलेले चित्ररथ यावेळी संचलनामध्ये सहभागी होणार आहेत.

## चंपाबाई गायकवाड यांचे निधन



के ज/प्रतिनिधीतालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ महिला चंपाबाई भगवान गायकवाड वय ८० वर्ष यांचे मंगळवार रोजी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आनंदगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली,दोन मुले,सुना, जावाई नातवंडे असा मोठा परिवार आहे.कष्टाळू भाभी म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. त्या ह.भ.प.दादा महाराज गायकवाड, उत्तम महाराज गायकवाड यांच्या मातोश्री होत.

# मुलांना सतत दूध देताय? हे असू शकते बद्धकोष्ठतेचे कारण; कोणत्या पदार्थांचा करा समावेश

दुधामुळे पौष्टिक पदार्थ खाण्याची इच्छा लहान मुलांना कमी होतेय असं दिसून येतंय का?. आहारात तंतुमय पदार्थांचा समावेश करण्याचा तज्ज्ञांचा सल्ला आहे. बद्धकोष्ठता टाळण्यासाठी काय करावे जाणून घ्या

बद्धकोष्ठता म्हणजे शौचास होताना त्रास होणे, शौचास अनियमितता असणे व कडक शौच असल्याने आणखी त्रास होतो होणे. दिवसातून एकदा किंवा एकापेक्षा कमी वेळा शौचास होणे नॉर्मल असते, पण जर शौच कडक होत असेल व होण्यात अनियमितता असेल त्याला बद्धकोष्ठता झालेली असते.

बदलती जीवनशैली, आहाराच्या चुकीच्या सवयी, शरीरात फायबरची कमतरता, तेलकट पदार्थांचे सेवन, आहारातील मैद्याचे पदार्थ यामुळे बध्दकोष्ठतेची समस्या वाढते.शाळेत जाणारी मुले काय व किती प्रमाणात खातात, त्यांचे पोट नीट साफ होते का याकडे पालकांनी विशेष लक्ष द्यावे असे तज्ज्ञ सांगतात. तज्ज्ञांनी नक्की काय सल्ला दिला आहे आणि अधिक माहिती दिली आहे जाणून घ्या (फोटो सौजन्य )

तज्ज्ञांनी दिला सल्ला

डॉ. सीमा जोशी, वरिष्ठ बालरोगतज्ज्ञ आणि समुपदेशक, अंकुरा हॉस्पिटल फॉर वुमन अँड चिल्ड्रन, पुणे यांनी सांगितले की, आजकाल मुले टीव्ही, स्मार्टफोन आणि व्हिडिओ गेम्समध्ये जास्त वेळ घालवतात. ज्यामुळे त्यांच्या शारीरिक हालचाली कमी होतात, व्यायाम होत नाही.





घाईघाईने सकाळच्या नित्यक्रमामुळे किंवा शाळेतील शौचालयाचा झटपट वापर, बराच वेळ मल धरून राहणे किंवा द्रवपदार्थांचे सेवन कमी करणे ही देखील बद्धकोष्ठतेची काही कारणे असू शकतात. आहारात दुधाचा व दुग्धजन्य पदार्थांचा अधिक समावेश असणे, बाटलीने दूध पाजणे, आहारात तंतुमय पदार्थांचा अभाव, कृत्रिम दूध पावडरचा वापरणे अशी काही बद्धकोष्ठतेची इतर कारणे आहेत.

काय आहेत लक्षणे

सतत पोटात दुखणे, शौच्छास घट्ट आणि कडक होणे ही बद्धकोष्ठतेची लक्षणे आहेत. याव्यतिरिक्त मल विसर्जन करताना होणाऱ्या वेदना, पोटदुखी, मुलांच्या अंतर्वस्त्रात होणारे शौच. मलावाटे रक्त येणे हे देखील एक चिंताजनक लक्षण आढळून येऊ शकते.

पोटात साचलेली घाण, बद्धकोष्ठता, डायबिटीस, लठ्ठपणा असे ८ आजार होतील छुमंतर, गरम पाण्यात मिसळा लिंबाचा रस

मुलांना काय खायला द्यावे?

मुलांना रोज सकाळी रिकाम्या पोटी ४-५ भिजवलेले मनुके खायला द्या. यामुळे पोटही वेळेत साफ होईल. गॅसची समस्या असल्यास रात्री झोपताना त्यांच्या पोटावर हिंगाची मालिश करा. मालीश करताना घड्याळाच्या काट्यांच्या दिशेने व हलक्या हाताने मालिश करा. पुरेसे प्रमाणात पाणी न प्यायल्याने मुलांना बद्धकोष्ठतेच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे मुलांना भरपूर पाणी प्यायल्या द्या. त्याचबरोबर दररोज तांदळाची पेज, फळांचा रस, नारळपाणी, भाजांचे सूप, ताक, लिंबु पाणी यांचाही आहारात समावेश करा असेही डॉ. जोशी यांनी स्पष्ट केले.

मुलांना शौचाला जायची सवय लावावी

एका ठराविक वेळेनंतर मुलांना शौचाला जाण्याच्या सवयी लावायला हव्यात. यामुळे बाळाच्या शरीराला वेळीच शी करण्याची सवय लागते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही. यासाठी मुलांना योग्य वयातच शौचास बसण्याची सवय लावणे गरजेची आहे. तुमचे मूल अंदाजे १८ महिने ते ३ वर्षांचे झाल्यानंतर तुम्ही पॉटी ट्रेनिंगची सुरुवात करू शकतात. पॉटी ट्रेनिंगची वेळ प्रत्येक मुलानुसार बदलू शकते.

रात्री बेडवर जाण्यापूर्वी दुधात मिक्स करून प्या देशी तेल, सकाळीच पोट होईल साफ; बद्धकोष्ठता होईल छुमंतर


बद्धकोष्ठतेवर कसा कराल उपाय

पुण्यातील अपोलो स्पेक्ट्रा रूग्णालयातील इंटरनल मेडिसिन एक्सपर्ट डॉ. सम्राट शाह म्हणाले की, बद्धकोष्ठतेची समस्येचा सामना करणाऱ्या मुलांच्या आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थ, मैदा, ब्रेड, बिस्किट, तेलकट पदार्थ व जंक फूडचा समावेश नसेल याची खात्री करा. मुलांच्या आहारात तंतुमय पदार्थांचा समावेश करा व त्याचे प्रमाण वाढवा. शौचाला दिवसातून किमान तीनदा तरी जायला हवे व शौचास झाली नाही तरी मुलांना शौचास बसविणे अत्यंत गरजेचे आहे. लहान मुलांना योग्य वयातच टॉयलेट ट्रेनिंग द्या.

# ब्रशने दातांची स्वच्छता करताना १ चूक पडेल भारी; तरूणपणातच बसवावी लागेल कवळी; बाबा रामदेव यांनी सांगितली युक्ती

तोंडाची स्वच्छता न पाळल्याने दात खराब होतात. टार्टर, प्लेक आणि कुजण्याने दात अकाली गळून पडू शकतात. दात स्वच्छ आणि मजबूत ठेवण्यासाठी ते पूर्णपणे धुवा. तसेच हिरड्यांना योग्यरित्या मालिश करा.

अन्न व्यवस्थित चावून खाल्ल्याने आपल्याला त्याचे पोषण मिळते. म्हणूनच दात खूप महत्वाचे आहेत, परंतु एका चुकीमुळे ते अकाली पडू शकतात. जुन्या काळात, लोकांच्या दातांचे आयुष्य ६०-७० वर्षे असायचे. आता लोकांना लहान वयातच पोकळी, टार्टर आणि प्लेक सारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. दातांच्या मुळांमध्ये क्षय झाल्यामुळे ते पडू लागतात. तोंडाचे आरोग्य चांगले राखून, सर्व ३२ दात मजबूत ठेवता येतात. बहुतेक लोक दात स्वच्छ करताना आणि धुताना काही चुका करतात. रामदेव बाबांनी याबद्दल एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये तोंड कसे स्वच्छ करावे आणि तोंड स्वच्छ करण्याची योग्य पद्धत कोणती आहे हे स्पष्ट केले आहे.





स्वामी रामदेव यांच्या अकाउंटवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये, डॉक्टर स्पष्ट करतात की बहुतेक लोक कुस्करताना चुका करतात. यामध्ये तीन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. ज्याप्रमाणे दात स्वच्छ केले जातात, त्याचप्रमाणे हिरड्या देखील त्याच पद्धतीने स्वच्छ केल्या पाहिजेत (फोटो सौजन्य )

हातांनी स्वच्छ करा हिरड्या

हिरड्या स्वच्छ करण्यासाठी करा हातांचा वापर

अनेकदा दात घासण्यापासून हिरड्या सुटतात. ब्रश हिरड्यांना घासल्याने जळजळ, रक्तस्त्राव आणि जखमा होऊ शकतात. पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही ते स्वच्छ करू नये. हिरड्यांना पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी, बोटाने घट्ट दाबून त्यांना मालिश करा. यामुळे रक्ताभिसरण वाढते आणि तुम्ही निरोगी व्हाल

दातांचा पिवळा थर काढून टाकण्याचा रामबाण उपाय, मोत्यांसारखे होतील दात; वापरा केवळ १ पान

चूळ कशी भरावी

चूळ भरण्याची योग्य पद्धत

तोंडातून स्वच्छ पाणी बाहेर येईपर्यंत तुम्ही धुणे चालू ठेवावे. त्याचा रंग दुधाळ नसावा. लोक सहसा दोन किंवा तीन वेळा धुवून काम पूर्ण करतात. तुम्ही सुमारे ८ ते १० वेळा धुवावे. चूळ भरण्याची योग्य पद्धत अनेकांना माहीतच नाही. अनेकदा चूळ नीट भरल्यामुळे अन्नाचे कण दातात अडकून पडतात आणि मग तेच कण कुजल्यामुळे हिरड्या आणि दात खराब होतात. त्यामुळे चूळ व्यवस्थित भरावी

चूळ भरण्यासाठी कोमट पाणी

कोमट पाण्याचा करा वापर

चूळ भरण्यासाठी कोमट पाणी वापरावे. कोमट पाण्यामुळे दात किंवा हिरड्यांवर अडकलेले सर्व खनिजे, पदार्थ आणि घाण विरघळते. लक्षात ठेवा की तोंडात जंतू, सूक्ष्मजंतू आणि विषाणू असे अनेक विषारी पदार्थ असतात. कोमट पाण्यामुळे ते दातातून लवकर बाहेर पडतात आणि दात आणि हिरड्या स्वच्छ राहण्यास मदत मिळते


तसंच चूळ हळूवार भरू नये तर खळखळून भरावी. दातांमध्ये अडकलेली घाण काढून टाकण्यासाठी हे आवश्यक आहे. ही घाण वेगाने येणाऱ्या-जाणाऱ्या पाण्यात वाहून जाते. एकदा उजव्या गालावर, नंतर डाव्या गालावर, नंतर ओठांच्या दिशेने चूळ भरावी

रामदेव बाबांनी सांगितले कशी ठेवावी स्वच्छता?

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# डॉ.शंकरदादा माने यांचा बसपाला शेवटचा जय भिम

कवठेमहांकाळ :- बहुजन समाज पार्टीचे सांगली जिल्हा अध्यक्ष त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदेश महासचिव पदी राहिलेले व २०१४ चे तथागतीत गृहमंत्री स्वर्गीय आर आर पाटील यांच्या विरोधात विधानसभा आमदार सुमन पाटील यांच्या विरोधात २०१९ ची विधानसभा आणि २०१९ ची माजी खासदार संजय पाटील यांच्या विरोधात लोकसभा निवडणूक आणि नुकत्याच झालेल्या २०२४ मधील विधानसभा लढलेला कार्यकर्ता गेले पंधरा वर्षे स्वाभिमानी प्रामाणिक काम करणारा निळ्या झेंड्याचा स्वाभिमानी कार्यकर्ता म्हणून ओळख असलेले डॉ. शंकरदादा माने यांना बहुजन समाज पार्टीचा शिलेदार म्हणून ओळखलं जात होतं,परंतु २०२४ च्या विधानसभा इलेक्शन मध्ये काही वरिष्ठाकडून मदत मिळाली नसल्यामुळे नाराज होऊन डॉ.शंकर माने यांनी बहुजन समाज पार्टी ला शेवटचा जय भीम केलेला आहे.त्यांनी पत्रकारांशी बोलताना अनेक मुद्द्यावर चर्चा केली आहे.ते म्हणत होते की बहुजन समाज पार्टीची विचारधारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व पार्टीचे संस्थापक कांशीराम यांची हत्तीनिशन घेऊन पंधरा वर्षे काम प्रामाणिक स्वाभिमानी काम केले परंतु वरिष्ठाकडून म्हणावी तशी सात मिळत नाही प्रत्येक वर्षी पार्टीला आर्थिक सहयोग करायचा परंतु इलेक्शनच्या काळामध्ये कार्यकर्ता काम करत असताना एक रुपयाही मदत न करता पार्टीच्या प्रचार प्रसार मध्ये ही कसुर केली जाते.माझ्या विधानसभेमध्ये मी निवडणूक लढत असताना वरिष्ठाकडून साधी एक सभा सुद्धा मला मिळाली नाही.माझ्यासारखा स्वाभिमानी प्रामाणिक काम करणारा कार्यकर्ता आणि त्याच्याबरोबर होत असलेले अशी हेळसट मला बघवत नाही बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे अन्याय करणे वाले



से बडा गुन्हेगार अन्याय सहन करणे वाला होता है. म्हणून आणि आपले येणारे आयुष्य आपापसात भांडणं काढत बसण्यापेक्षा दुसरा मार्ग निवडणे हा महत्त्वाचा विषय मला वाटतो. पार्टीमध्ये काम करत असताना आदरणीय कांशीराम परम आदरणीय बहन कुमारी मायावती यांनी वारंवार दिलेले आदेश आणि सांगली जिल्हा तसेच तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभेमध्ये संघटनची बांधणी करत असताना अनेक एक पक्षातील लोकांबरोबर विरोध पत्करावा लागत असतो.सत्ताधारी काही वेळे आपल्यावर खोटे गुन्हे टाकतात.सत्ताधारी सत्तेचा गैरवापर करतात, अशा आपल्या सत्तेचा गैरवापर करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना थांबवण्याचे काम पार्टीच्या वरिष्ठांनी केले पाहिजे कार्यकर्त्यांना मदत केले पाहिजे परंतु कार्यकर्ता संकटात सापडला की त्याला वाऱ्यावर सोडले जाते.तो त्याचे आयुष्य खराब करतो या बाबी लक्षात आल्या म्हणून हा निर्णय घेत आहे.मी कुमारी बहन मायावती आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांनी सांगितल्याप्रमाणे आंदोलन केली त्या आंदोलनामध्ये माझ्यावर खोटे गुन्हे दाखल झाले.गुन्हे दाखल झाले म्हणून पार्टीने मला कोणतीही मदत केली नाही,किंवा पोलीस स्टेशनला विचारपूस केली नाही वरून निवडणुकीमध्ये माझे तिकीट कट करण्याचा प्रयत्न करून माझ्याबरोबर अन्याय केला आहे.मला सरळ सांगण्यात आलं तुमच्यावर गुन्हे दाखल आहेत तुम्ही निवडणूक लढू शकत नाही. पार्टीमध्ये काम करत असताना लोकांना न्याय देत असताना अनेक गुन्हे दाखल होतात मग याचा अर्थ असा तर नाही की आमची गुन्हेगारी पार्श्वभू आहे मला तर असं म्हणायचं आहे की आम्ही विरोधकांसाठी तर गुन्हेगार आहेच परंतु आमच्या पार्टीसाठी सुद्धा ठरलो मग आंदोलन करायचं आणि लोकांना न्याय मिळवून द्यायचा तर गुन्हे दाखल होतात.मग आम्हाला तिकीट सुद्धा देणार नाही अशी परिस्थिती असेल तर पार्टी सोडणे कधी पण बरोबर निर्णय ठरेल. मी पार्टीचा व पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष परम आदरणीय बहन कुमारी मायावती तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील डोंगरे यांचा आभारी आहे कारण या लोकांनी मला गेले पंधरा वर्ष बहुजन समाज पार्टीच्या पदावर ठेवलं आणि त्या विश्वासाने आम्ही काम करत राहिलो जास्त काही या लोकांबद्दल किंवा पार्टी बद्दल मला बोलायचं नाही परंतु एखादा नवनिर्वाचित पदाधिकारी किंवा कार्यकर्ता असेल तर त्या कार्यकर्त्याची कदर पार्टीने केली पाहिजे पार्टीने त्यांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून काम केले पाहिजे एवढंच माझा सल्ला राहील पार्टी ही मिशन मुव्हमेंट मध्ये काम करणारी पार्टी आहे आणि पार्टीचे काम करणारा कार्यकर्ता आपलं घरदार संसार कुटुंब जाळून काम करतो किमान तो इलेक्शनला उभारल्यानंतर त्याला पार्टीने मदत करणे अपेक्षित असते इतर उमेदवारास तिकीट देताना तुमचा प्रोटोकॉल ठीक आहे परंतु आपले जीवन दिलेल्या कार्यकर्त्यांना तर तुम्ही मदत करणे अपेक्षित होतं ते अपेक्षा भंग झाल्यामुळे मी पार्टीचा राजीनामा देत आहे माझा बहुजन समाज पार्टी व पार्टीतील सर्व पदाधिकाऱ्यांना शेवटचा जयभीम माझ्यासह उपस्थित अजित दादा खंदारे,जालिंदर मोहिते,बाळासो पाटील,शुभम चव्हाण, सिद्धनाथ माने,सुनील खोत,विशाल करपे,गौरव लोंढे,मुशाहिद पटेल,सविता माने,संजना आठवले,उज्वला धोत्रे,रेश्मा वनखडे,शबाना पटेल,नंदा यमगर, जोया वारे,सायली साठे,अर्चना मोहिते,सुषमा लोंढे,श्रद्धा आठवले,संगीता धेंडे प्रमिला वाघमारे.

# शहर असो कि ग्रामीण भाग मोकाट जनावरांची प्रवाशीच्या मनात दहशत,राष्ट्रीय महामार्गा असो की ग्रामीण रस्ते

किनवट/शेख शौकत :–जनतेला होणाऱ्या त्रासाचे नगरपरिषद आणि ग्रामपंचायतीला काहीही देणे घेणे नाही. किनवट शहरासह अनेक गावांमध्ये कोंडवाडे रिकामे पडले आहेत, आधुनिक युगामध्ये विज्ञानाने जशी प्रगती केली, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील कोंडवाड्याची प्रगती हद्दपार झाल्याचे आपल्याला पाहाव्यास मिळत आहे. काही वर्षाआधी प्रत्येक गावामध्ये कोंडवाडे राहायचे जर एखाद्या शेतकऱ्यांच्या जनावरांनी कोणत्याही पिकाचे नुकसान केले तर जनावरांना पकडून गावातील ग्रामपंचायतच्या कोंडवाड्यामध्ये कोंडायचे असायचे त्याला दिवसाप्रमाणे ग्रामपंचायत व नगरपरिषद दंडाची पावती मालकाला देत गेले म्हणजेच ग्रामपंचायत व नगरपरिषदला उत्पन्न मिळायचे पण आता ग्रामपंचायतला त्या कोंडवाड्याच्या फायद्याची गरज नसताना कोंडवाडे हद्दपार झाले आहेत याला कोण जबाबदार असायला पाहिजे जनावरे शहरांमध्ये व



ग्रामीण भागामध्ये रस्त्याच्या मधोमध अतिक्रमण करून राहतात आणि व्यवसायिकाला आणि पायी चालणाऱ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो मोकाट जनावराचा बंदोबस्त करावा अशी अपेक्षा नागरिकांकडून होत आहे, जनावरे अनेक जण विकत घेतात आणि त्यांना खाण्यापिण्याचा खर्च परवडत नाही म्हणून गावात ते रस्त्यावर मोकाट सोडतात आणि रस्त्यावर मोकाट फिरत असताना खराब झालेले खरकटे आणि प्लास्टिकच्या पिशव्या यामुळे या जनावरांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.त्यातच गाढवांचाही मोठा त्रास सहवासीयांना या मोकाट जनावरा सोबतच आणि बकऱ्यासोबत करावा लागतो पण आपण आता डिजीटल झालो जुनी परंपरा विसरत चालली आणि मोकाट जनावरांची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्याकरता कोंडवाड्याचे नूतनीकरण होणे गरजेचे आहे पुन्हा कोंडवाडे निर्माण झाले पाहिजे गावातील शेतकऱ्याला व्यवसायिकाला वाहन चालकाला या मोकाट जनावारापासून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा सर्व सामान्य करत आहे.

# खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर आता गुरुवारी सुनावनी

केज/प्रतिनिधी –केज तालुक्यातील मस्साजोग शिवारात उभारण्यात आलेल्या आवादा पवन ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना २ कोटीची खंडणी मागून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी केज न्यायालयाने न्यायलयीन कोठडी सुनावलेल्या व मकोका खाली एस आय टी ने ताब्यात घेतलेल्या वाल्मिक कराड याच्या जामीन अर्जावरील सुनावनी पुन्हा पुढे ढकलण्यात आली आसून आता ही सुनावनी गुरुवारी केज न्यायालयात होणार आहे.



मकर संक्रातीच्या दिवशी वाल्मिक कराड याला खंडणी च्या गुन्ह्यात केज न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्याच वेळी त्याचे वकील ड.सिद्धेश्वर ठोंबरे यांनी न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. १६ जानेवारी रोजी सरकारी वकील ड.जितेंद्र शिंदे यांनी आपले म्हणणे मांडणारा शे केज न्यायालयात दाखल करताच या प्रकारांणाची सुनावनी शनिवारी दि. १८ होईल आसे न्यायालयाने सूचित केले होते. दरम्यान शनिवारी आरोपीचे वकील ड.अशोक कवडे यांनी डोळ्याच्या आजारामुळे ही सुनावनी पुढे ढकलण्या साठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. व सोमवारी दि. २०सुनावणी ठेवली होती. परंतु सोमवारी ही वाल्मिक कराड याचे वकील ड.अशोक कवडे यांनी सुनावणी पुढे ढकलण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आसता, न्यायालयाने याला नकार देताच, सरकारी वकिलांनी दिलेल्या शे ची प्रत आम्हाला मिळालेली नाही. ती मिळावी असा अर्ज केला. सरकारी वकील ड. जितेंद्र शिंदे यांनी त्यांना शे ची प्रत दिली. त्यानंतर ही सुनावनी आता गुरुवारी सकाळी ११–०० वाजता होईल. आसे न्यायाधीश एस. व्ही.पावसकर यांनी जाहीर केले. त्यामुळे आता ही सुनावनी गुरुवारी केज न्यायालयात होणार आहे.

# सोनापीर बाबा दर्गाच्या विकासासाठी निधी द्यावा

किनवट/शेख शौकत :–सर्वधर्मीय तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माहूर गडावरील सूफी संत तसेच सर्व धमीर्यांसाठी श्रद्धास्थान असलेल्या बाबा सोनापीर दर्गा साठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात कोट्यावधी रुपये मंजूर होऊनही अद्याप कुठलीही समस्या निकाली निघाली नसल्याने दरवर्षी स्वातंत्र्योत्तर काळापासून लाखो भाविक ५ मार्च रोजी माहुरात दाखल होऊन नित्यनेमाने ५ दिवस उर्समध्ये धार्मिक कार्यक्रम साजरे करतात



कव्वाली कुस्ती सह विविध कार्यक्रमांचा व मनोरंजनाच्या वस्तूंचा आनंद घेत असतात परंतु येथे कुठलीही सुविधा नसल्याने भाविकातून तीव्र नाराजी व्यक्त असून येथील विकास कामासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सर्वधर्मीय भाविकातून होत आहे. सुफी संत सोनापीर बाबा यांचीदर्गाअतिशयपुरातन असून शेकडो वर्षांचा पौराणिक इतिहास असल्याने येथे महाराष्ट्र आंध्रा कर्नाटक तेलंगाना मध्यप्रदेश उत्तर प्रदेश जम्मू कश्मीर यासह अनेक राज्यातून लाखोंच्या संख्येने भाविक येथे उर्स निमित्त येतात पाच दिवस राहून धार्मिक कार्यक्रमासह आलेल्या भक्तांना महाप्रसाद वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा देतात तसेच हजारावर खेळणे कपडे पादत्राणे किराणा हॉटेल्स सह विविध प्रकारच्या मिठाईची दुकाने येतात तर बाबा लंगोट बंद दरगाहांसमोर मैदानात मौत का कुवा रेल गाडी पन्नालाल गधा लहान मुलांसाठी खेळण्याचे विविध प्रकारचे स्टॉल्स झुले तसेच लहान मुलांना निशानेबाजी शिकविण्यासाठी बंदुकी द्वारे फुगे फोडण्याची दुकाने तिरंदाजची दुकाने तसेच अनेक प्रकारचे मनोरंजनाचे स्टॉल्स येथे लागतात त्यामुळे हजारो च्या संख्येने सर्व धर्मीय नागरिक येथे लहान मुलासह येऊन आनंद घेतात. नवनियुक्त पालकमंत्री अतुल सावे खासदार नागेश पाटील आष्टीकर आमदार भीमराव केराम साहेब यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे सह बाबा सोनापीर दर्गा येथे मार्च महिन्याच्या उरूस सुरू होण्याआधी संयुक्त भेट द्यावी आणि येथील पाहिजे असणारे विश्रामगृह सार्वजनिक शौचालय स्नानगृह रस्ते गार्डन भक्तनिवास प्रसादालय पाणीपुरवठा आणि सुरक्षा व्यवस्था साठी एक कलमी कार्यक्रम तयार करून कालबद्ध विकास राबवावा अशी मागणी येथे येणाऱ्या भाविकासह सर्वधर्मीय शहरवासी नागरिकांतून होत आहे.

# कल्याण मध्ये लेवा पाटीदार समाजाचा स्नेहसंमेलन मेळावा संपन्न

कल्याण : लेवा पाटीदार समाज मंडळ कल्याण चा वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा नुकताच शारदा विद्या मंदिर लालचौकी,कल्याण (प)येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला .समाजातील १५०० च्यावर बंधू भगिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.यावेळी बालगोपाळांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. हा तर लेवा पाटलांचा मिनी कुंभमेळाच असल्यानचे मत ज्येष्ठ समाजसेवक व पत्रकार सुनील इंगळे यांनी बोलताना व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.प्रा.शिरीष पाटील, डॉ.जयंत चौधरी, मुंबई तील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक श्री.रत्नाकर चौधरी उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष श्री हेमंत चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी कल्याण मधील जास्तीत जास्त समाजबांधवांनी या कार्यक्रमास येवूनआपापल्या विचारांचे आदान प्रदान केले पाहिजे असे आवाहन केले. सदर कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने करण्यातआली.विद्येची देवता श्री सरस्वती मातेचे पूजन करून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि लेवा पाटीदार




समाजाचे प्रेरणास्थान सरदार वल्लभभाई पटेल,कवियत्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.या कार्यक्रमासाठी लेवा पाटील समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या वेळी रोटरी क्लब ऑफ सेंट्रल,कल्याण व डॉ विजय महाजन संस्थापक अध्यक्ष असलेल्या इंदाला शैक्षणिक समूह यांच्या संयुक्त विद्यमाने ईशा नेत्रालय कल्याण यांचेकडून नेत्र तपासणी व दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात मोफत चष्मे वाटप करण्यात आले.महिलांसाठी आयोजित लकी ड्रॉ च्या माध्यमातून पैठणी साड्या, तसेच गुणगौरव व विशेष प्रविण्य मिळवलेल्या मुलांचे सत्कार करण्यात आले. लेवा पाटीदार समाज मंडळाने या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून समाजाच्या एकतेला अखंडतेला नव्याने आकार देण्याचा मनापासून प्रयत्न केला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिसरातील लेवा बांधव,डॉक्टर्स, व्यावसायिक, समाजसेवक ह्यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले.समाजातील दानशूर सदस्यांनी स्वतःहून विविध गोष्टीसांठी देणगी देऊन मंडळाच्या ह्या सामाजिक उपक्रमाला मोठी साथ दिली. हे स्नेहसंमेलन उपस्थितांमध्ये आनंद व उत्साह निर्माण करणारे ठरले. सरते शेवटी सर्व समाज बांधवांनी एकत्रित येऊन, एकमेकास सहाय्य करून आपली ही लेवा पाटलांची ओळख सर्व दूर पोहोचवण्यास सहकार्य करून एकमेकात बंधुभाव रुजवावा असे मंडळातर्फे आवाहन करून उपस्थित सर्वांचे मंडळाचे सहसचिव श्री दीपक नेमाडे यांनी आभार व्यक्त केले.

# संविधान गौरव अभियानाच्या अनुषंगाने लातुरात संविधान गौरव सभेचे आयोजन – प्रेरणा होनराव



लातूर : भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभर संविधान गौरव अभियान राबविण्यात येणार असून त्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातही हे अभियान राबवले जात असून लातूर शहरात संविधान गौरव सभेचे आयोजनही करण्यात येणार असल्याची माहिती भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्त्या तथा संविधान गौरव अभियान समितीच्या सदस्या प्रेरणाताई होनराव यांनी मंगळवारी सकाळी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली. संविधान गौरव अभियानाच्या निमित्ताने राज्यात सर्वच जिल्हास्थानी संविधान गौरव सभाही होणार आहेत. त्यासाठी राष्ट्रीय तसेच प्रदेश पातळीवरील मान्यवर नेत्यांची उपस्थिती राहणार असल्याचे सांगून प्रेरणाताई होनराव यांनी ठाण्यात होणाऱ्या संविधान गौरव सभेस केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून पुण्यात ज्योतिरादित्य शिंदे , नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संविधान गौरव सभा होईल. राज्यात ठिकठिकाणी मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत या सभा पार पडणार आहेत. भारतीय राज्यघटना अर्थात संविधान लिहिणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आणि संविधानाचा अवमान करण्याचे काम काँग्रेसने, काँग्रेसच्या नेत्यांनी सातत्याने केले आहे, हे सर्वज्ञात आहे. संविधानाची निर्मिती करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करणायचे काम अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात झाले आहे, ही बाब भाजपवर टीका करणाऱ्यांनी कदापि विसरता कामा नये,असेही प्रेरणान्ती होनराव म्हणाल्या. अतिशय विद्वान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना काँग्रेसने विदेश नीति, आर्थिक मुद्यांच्या बाबतीत का सहभागी करून घेतले नाही ? असा सवाल करून त्यांनी काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कायम कुचंबणा करण्याचे काम केल्याचा आरोप केला. भाजपच्या वतीने हे अभियान अतिशय प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. त्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी निबंध – वक्तृत्व स्पर्धांचेही आयोजन केले जाणार आहे. विविध शैक्षणिक उपक्रमही त्या अनुषंगाने राबवले जाणार आहेत. नागरिकांना माफक शुल्कात संविधानाच्या प्रतीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सामान्य माणसांच्या हिताचे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. संविधान गौरव अभियानात त्यांचे योगदान अतिशय मौलिक आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने सोपवलेली जबाबदारी आपण सक्षमपणे पूर्ण करण्याचे काम केले आहे, असेही प्रेरणाताई होनराव यांनी यावेळी सांगितले. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी संविधान गौरव अभियानाच्या यशस्वीतेसाठी भाजपचे सर्व पदाधिकारी – कार्यकर्ते सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. या प्रसंगी प्रा. पंडितराव सूर्यवंशी, संजय सोनकांबळे , रत्नमाला घोडके ताई , माजी नगरसेविका आल्टे ताई यांची उपस्थिती होती.

# डॉक्टर पुरुषोत्तम बोंदरे यांची. राज्य सांस्कृतिक पुरस्कार निवड समिती मुंबईवर नियुक्ती करण्यात आली,

भंडारा:– जिल्ह्यातील, भिकारखेडा गाव – मुंबई नाव. राज्य सांस्कृतिक पुरस्कार निवड समिती मुंबई वर. डॉक्टर पुरुषोत्तम बोंद रे भिकार खेडा तालुका मोहाडी जिल्हा भंडारा, यांची नियुक्ती करण्यात आली, ( झाडीपट्टी/ खडी गंमत / दंडार / भारुड ) इत्यादी लोककला, यावेळी शाहीर राजू गजभिये, राजहंस मस्के, शत्रुघन वैद्य, प्रिया सहारे, दीक्षा मेश्राम, दर्शन गजभिये, प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे, शाहीर अरुण मेश्राम, गणेश देशमुख, गायिका तनुजा नागदेवे, गायक उमेश बोरकर, शाहीर गणेश मेश्राम, नंदा गवळी, पुष्पा निर्वाण, प्रेम दयाळ सरोते, गोपाल हटवार, रमेश धुर्वे, अनिल मोहू ले, सुभाष हटवार, सुप्रसिद्ध शाहीर पांडुरंग ससान क र, यांनी भजन गायन करून अभिनंदन केले, मोठ्या संख्येने कलाकार उपस्थित होते



# तोंडार येथील विलास सह.सा. कारखाना युनीट-२ चे ६४ दिवसात २.४३ लाख मे.टन गाळप

विलास सह. सा. कारखाना लि. युनीट–२. तोंडार ता. उदगीर या कारखान्याच्या सन २०२४–२५ या हंगामाचा गळीत हंगाम शुभारंभ दि. १८/११/२०२४ रोजी संपन्न झाला असून संस्थापक तथा माजी मंत्री मा.आ.श्री.अमित विलासरावजी देशमुख साहेब यांनी केलेल्या सुचनेनुसार विलास, युनीट–२ येथील कार्यकारी संचालक, खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी योग्य नियोजन करून कारखान्याची प्रती दिन गाळप क्षमता २५०० मे.टन असताना दि.२०/०१/२०२५ रोजी एका दिवसात ४३१० मे.टन उच्चांकी गाळप करून एक विक्रम प्रस्थापीत केला आहे.

कारखान्याने दि.२०/०१/२०२५ अखेर ६४ दिवसात १५२ टक्के गाळप क्षमतेचा वापर करून प्रती दिन सरासरी ३८०५ मे.टन याप्रमाणे २.४३ लाख मे. टन उच्चांकी गाळप केले असून बी–हेवी व सिरफ डायव्हर्शनसह अंदाजे ११.८५ टक्के साखर उताऱ्यासह २३९३०० क्वि. साखर उत्पादीत केली आहे. तसेच आसवणी प्रकल्पाची ६० के. एल.पी.डी क्षमता असताना दि.२०/०१/२०२५ रोजी ९०९०६ ब.ली. आर.एस. व ९२०१६ ब.लि. ईथेनॉलचे उच्चांकी उत्पादन केले आहे.

लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टिकोणातून विकास मार्गातील शेतकरी हा केंद्र बिंदू मानून माजी मंत्री सहकारमहर्षी मा. श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब, कारखान्याचे संस्थापक तथा माजी मंत्री मा.आ.श्री.अमित विलासरावजी देशमुख साहेब, लातूर जिल्हा मध्य. सह. बँकेचे चेअरमन मा.आ.श्री. धिरज विलासरावजी देशमुख साहेब तसेच कारखान्याच्या चेअरमन मा.श्रीमती वैशाली विलासरावजी देशमुख मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली उदगीर तालूक्यातील बंद असलेला प्रियदर्शीनी साखर कारखान्याचे विलास राह. साखर कारखाना लि. युनिट–२ तोंडारच्या माध्यामातून २०१४ पासून गाळप चालू करून कारखान्याची यशस्वीपणे वाटचाल चालू असून कारखान्याने आगदी अल्पावधीत प्रत्येक क्षेत्रात गरूड झेप घेतली आहे. विकासाचा दुसरा टप्पा म्हणजे कारखान्याचा आसवणी प्रकल्प कार्यान्वीत झाला असुन हाच विकासाचा मार्ग निरंतर चालत राहील. तसेच प्रत्येक हंगामात ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त ऊस दर दिलेला आहे त्यामुळे जळकोट, उदगीर, देवणी, शिरूळ अनंतपाळ, अहमदपूर, चाकुर तालुक्यातील ऊस उत्पादकांमधून विलास सह. साखर कारखाना लि. युनिट २ तोंडारच्या माध्यामातून ऊस उत्पादकांच्या जिवनात प्रत्यक्षात अच्छे दिन आल्याची भावना व्यक्त होत आहे. यावरून श्रेध्देय विलासरावजी देशमुख साहेब यांनी उराशी बाळगलेले स्वप्न साकार झाल्याचे प्रत्यक्षात दिसून येत आहे. अशी माहिती कारखान्याचे व्हा. चेअरमन मा.श्री. रविंद्र काळे यांनी दिली.



चालू हंगामात विलास सह. सा. कारखाना युनीट–२, लि. तोंडार ने कारखान्याची प्रती दिन २५०० मे.टन गाळप क्षमता असताना आवघ्या ६४ दिवसात २ लाख ४३ हजार मे. टन ऊसाचे गाळप करून प्रकल्पाच्या कार्यक्षमतेचा जवळपास १५० टक्के वापर करून स्पीरीट आणि ईथेनॉलचे उच्चांकी उत्पादन केल्याबद्दल कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.ए. आर. पवार यांचेसह वर्क्स मॅनेजर श्री. कोळगे, चिफ केमिस्ट श्री. खरात, मुख्यशेतकी अधिकारी श्री. मोकाशे, चिफ अर्कोटंट श्री. चांडक, डिस्टीलरी मॅनेजर श्री. शेख पर्चेस ऑफीसर श्री.डी.जी. पाटील, विभागप्रमुख, कर्मचारी, कामगार व ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार व ऊस उत्पादक शेतकरी यांचे सहकारमहर्षी माजी मंत्री मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतीक कार्यमंत्री मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख साहेब, लातूर जिल्हा मध्य. सह. बँकेचे चेअरमन मा.आ.श्री. धिरज विलासरावजी देशमुख साहेब व कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांनी अभिनंदन केले व हंगामाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या !!

विलास सह. सा. कारखाना युनीट–२. लि. तोडार च्या माध्यमातून कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व उपलब्ध ऊस क्षेत्राचे वेळेवर गाळप पूर्ण करून जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे ऊस उत्पादकांनी आपला ऊस इतर कारखान्यास गाळपास न देता जास्तीत जास्त ऊस विलास युनीट–२ कारखान्याकडे गाळपास द्यावा जेणे की, ऊस उत्पादकांचे अर्थिक नुकसान होणार नाही असे अवाहन कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.ए. आर. पवार यांनी केले.

# टीसी हरवले आहे

धनंजय नागनाथ राऊत राहणार पाखरसांगवी यांची खाडगाव ते पाखर सांगवी रस्त्यावर टोने प्रवास करत असताना दि. ११ जानेवारी २०२५ रोजी महात्मा फुले माध्यमिक विद्यालय लातूर इयत्ता ८ पास ची टीसी हरवली आहे. जर कोणास सापडली असेल तर खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावे योग्य बक्षीस दिले जाईल

संपर्क

९२६०००००८३

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE